# प्रकरण नववे

# उपसंहार

## प्रकरण नववे

## उपसंहार

'आठवणींचे पक्षी' व 'मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे' ही दलित लेखकांची दोन आत्मकथने होत. मात्र या दोन्ही आत्मकथनाच्या गुणवत्तेत कमालीचा फरक असल्याचे सकृत्दर्शनीच जाणवते. वाङ्‌मयीन गुणवत्तेत हा जो फरक पडला आहे, तो कोणकोणत्या कारणांनी पडला याचा शोध घेणे हा उद्देश डोळ्यांपुढे ठेवून आपण या अभ्यासास प्रवृत्त झालो. ही दोन्ही पुस्तके दलित साहित्यात मोलाची व आत्मकथनाच्या स्वरूपाची असल्यामुळे त्यांचे स्वरूप तपासण्याआधी दलित वाङ्‌मयाचे स्वरूप व आत्मचरित्रपर वाङ्‌मयाची वैशिष्ट्ये लक्षात घेणे आवश्यक होते म्हणून पहिल्या प्रकरणात दलित साहित्याची प्रेरणा, स्वरूप व आत्मचरित्रपर लेखनाचे विशेष यांचा विचार केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आणि विचारप्रणाली हीच दलित साहित्याची प्रेरणा आहे. दलित साहित्याच्या स्वरूपाविषयी एक भूमिका नकार, विद्रोह यांना प्राधान्य देणारी, जन्मजात अस्पृश्यतेला महत्त्व देणारी आहे; तर दुसरी, आर्थिक शोषणाला महत्त्व देणारी आहे. या द्विविध भूमिकेंचा विचार या प्रकरणात केला आहे. याचबरोबर दलित आत्मकथने आत्मचरित्रपर वाङ्‌मयाला अतिशय जवळची असल्यामुळे आत्मचरित्रपर वाङ्‌मयाच्या लेखकाच्या प्रामाणिकपणा, प्रांजळपणात हया नैतिक गुणांच्या जोडीने व्यक्तिदर्शन कौशल्य, प्रसंगांची निवड, कलात्मक मांडणी इत्यादी वैशिष्ट्यामुळे अशा लेखनाची गुणवत्ता कशी वाढते याचा येथे विचार केला आहे.

दुसऱ्या प्रकरणात 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनाच्या निवेदकाच्या (लेखकाच्या) व्यक्तिमत्त्वाचे विशेष कसे प्रकट झाले आहेत ते विचारात घेतले आहेत. आपली अस्पृश्य जात, बहिणीचे दारिद्र्य आणि आपले अनाथपण

यातून निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीची निवेदकाला जाणीव आहे· त्याचे मन जसे भित्रे आहे तसेच श्रध्दाळू आहे· मानवामधील चांगुलपणावर लेखकाची श्रध्दा आहे· ✓इतरांनी आपले कौतुक करावे यासाठी प्रल्हादचे बालमन सतत धडपडत असलेले असंख्य प्रसंगातून जाणवते· उपकारकर्त्यांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणारा लेखकाचा कृतज्ञ स्वभाव ब-याच घटनांतून दिसतो· स्वत:च्या सुखदु:खापेक्षा इतरांच्या सुख-दु:खाचा विचार करणारे विशाल अंत:करण या निवेदकाकडे आहे· स्वत:च्या वाटयाला आलेले कटू अनुभव पचवून सुखाचा - आनंदाचा शोध घेण्यासाठी धडपडणारा नायक या आत्मकथनामध्ये भेटतो· जी अनेकविध वैशिष्टये जाणवतात त्यांचे येथे सोदाहरण विवेचन केले आहे·

ज्या समाजात 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनाचा नायक प्रल्हाद जीवन जगला त्या समाजाचे दर्शन, त्याचे व्यक्तिमत्त्व घडविले त्या समाजाचे अस्सल रुप हया आत्मकथेत कसे येते व त्यामुळे जीवन दर्शनाचे सामर्थ्य या आत्मकथेला आपोआपच कसे प्राप्त होते याचा ऊहापोह या प्रकरणात केला आहे· स्वाभाविकपणेच या समाजाच्या श्रध्दा, अंधश्रध्दा, रुढी परंपरा, संकेत, दारिद्र्य, इत्यादी बाबींचा विचार येथे केला आहे·

चौथ्या प्रकरणात 'आठवणींचे पक्षी' या पुस्तकातील भाषाशैली, छोटी छोटी आशयधन वाक्यरचना, बोली भाषेतील शब्द, म्हणी, वाक्प्रचार, व्यक्तिचित्रणे आणि प्रसंग रेखाटण्याचे कौशल्य हया विशेषांच्या जोडीनेच लेखकाच्या मनाची प्रगल्भता व त्याच्या अनुभवाचा आवाका हया गुणविशेषां-मुळे हया आत्मकथनास श्रेष्ठ दर्जाची गुणवत्ता प्राप्त होते याबाबतचे विवेचन केले आहे·

पाचव्या प्रकरणामध्ये अभ्यास विषय असलेले दुसरे दलित आत्मकथन 'मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे' हया आत्मकथनाच्या निवेदकाच्या (लेखका-च्या) व्यक्तिमत्त्वाचा विचार केला आहे· त्याचे आत्मकेंद्री मन, एकल-

कोंडा, शांतताप्रिय, मितभाषी स्वभाव, स्वभावातील विसंगती, मान-सन्मान-प्रसिध्दीसाठी धडपडणारे लेखकाचे मन, लेखकाकडे असणा-या समंजस वृत्तीचा अभाव, त्याला वाटणारा स्वत:च्या समाजाविषयीचा तिरस्कार आणि सवर्ण समाजाविषयीचा द्वेष, परिस्थितीची अयथार्थ जाणीव व निर्णय-शक्तीचा अभाव, वाचनाची आसक्ती इत्यादी जे स्वभाव विशेष जाणवतात त्याचे विवेचन केले आहे·

कोणत्याही लेखक समकालीन सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणात जीवन जगत असतो म्हणून सहाव्या प्रकरणात मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे मध्ये येणारा कोकणी समाज आणि कोकणातील चांभार समाज, त्या समाजात असणारे स्पृश्य-अस्पृश्य, गरीब-श्रीमंत हे भेद आणि या भेदांचा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर होणारा परिणाम याचा विचार केला आहे· या आत्म-कथनात येणा-या समाज दर्शनात लेखकाची अशी वैशिष्टयपूर्णता जाणवत नाही· लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची प्रगल्भता, संवेदनशील अनुभवाचा वेगळेपणा, मना-च्या व्यापकपणातून निर्माण झालेली चिंतनशीलता हया अथवा अशा विशेषां-चा प्रत्यय या आत्मकथेत येत नाही· सार्वत्रिक दिसून येणा-या सामाजिक स्वरूपाच्या अन्यायाचे, तक्रारखोरपणाने केलेले निवेदन असे सपाट स्वरूप या हया सामाजिक दर्शनाला प्राप्त झाले आहे·

सातव्या प्रकरणात कोंडविलकरांच्या शैली व गुणवत्तेबाबत ऊहापोह केला आहे· मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे मधील 'दैनंदिनी' रूप अभि-व्यक्तीच्या अपरिहार्यतेतून आले नसून लेखकाला स्वत:च्या भूमिकेला हे 'दैनं-दिनी' रूप सोयीचे वाटले म्हणून त्याने स्वीकारले आहे· येथील भाषेच्या जाणिवा पांढरपेशा समाजाच्या आहेत· या आत्मकथनातील निवेदक (लेखक) ही मध्यवर्ती व्यक्ती अतिशय निर्जीव बनली आहे· कोणत्याही अनुभवाकडे लेखक एक विशिष्ट दृष्टिकोनातून बघतो त्यामुळे विविध अनुभव असूनदेखील येथे तोचतोपणा जाणवतो· या बाबींबरोबरच राजापुरी बोली-

चा लेखकाने केलेला अचूक वापर. वास्तवदर्शी शैलीच्या मदतीने प्रसंगांची केलेली मांडणी, गौण व्यक्तींची प्रभावी चित्रे याचा येथे विचार केला आहे. शेवटच्या प्रकरणामध्ये 'आठवणींचे पक्षी' आणि 'मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे' या दोन्ही आत्मकथनांतील साम्य - भेदांचा विचार करून या दोन्ही आत्मकथनाच्या गुणवत्तेत कसा फरक पडला आहे हे दाखविले आहे. ✓सोनकांबळे आणि कोंडविलकर या दोघांच्या व्यक्तिमत्त्वात खूप फरक आहे. ✓सोनकांबळे यांची माणसावर, माणसाच्या चांगुलपणावर माणुसकीवर नितांत श्रद्धा आहे. ✓त्यामुळे व्यापक मानवतावादी दृष्टीने ते अनुभवांचे कथन करीत आहेत. ✓'मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे' मध्ये हया मानवतावादी दृष्टीचा अभाव दिसतो. ✓कोंडविलकरांची समस्या खूप वरवरची आहे. आवडणारी पुस्तके आणि ही पुस्तके वाचण्यासाठी आवश्यक असणारे शांत वातावरणासाठी कोंडविलकरांची धडपड दिसते, तर 'आठवणींचे पक्षी' मध्ये एक निरागस, निष्पाप बालक जगण्यासाठी आवश्यक असलेल्या भाकरीसाठी धडपडत असलेले दिसते. कोंडविलकरांच्या जीवनात दु:ख निर्माण करण्यास चांभार समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, दैववाद याबरोबरच लेखकाचा स्वभाव कारणीभूत आहे, तर सोनकांबळ्यांच्या जीवनात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, प्रतिकूल परिस्थिती दु:ख निर्माण करते. सोनकांबळे अनुभव जसा घेतला तसा वाचकांसमोर ठेवतात त्यामुळे त्यातील वास्तवाच्या दर्शनाने वाचक हादरून जातो. तर कोंडविलकर आपल्या भूमिकेला पूरक असणाऱ्या घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा निर्माण करीत आहेत असे सतत वाटत राहते. या दोन आत्मकथनामध्ये मुख्य फरक पडतो तो लेखकाच्या व्यक्तिमत्त्वामुळे आणि जीवनविषयक दृष्टिकोणामुळे. अत्यंत खडतर स्वरूपाची दु:खे आणि अवहेलना सोनकांबळे यांच्या वाटयाला आलेली असली तर त्यांच्या आत्मकथनातून त्यांच्या वृत्तीचा प्रगल्भपणा आणि विशाल मानवतावादी दृष्टिकोन यांचा सातत्याने आविष्कार घडतो. तर कोंडविलकरांच्या लेखनातून

त्यांचे आत्मकेंद्रित वृत्तीच प्राधान्याने दिसून येते. काही व्यावहारिक सोयी सवलतींचा तेवढा ध्यास घेऊन ते सतत तक्रारखोरपणा करीत आहेत. ॥ असे आपल्याला जाणवत राहते. त्यांच्या वृत्तीचा प्रगल्भपणा अथवा विशाल दृष्टिकोण यांचा फारसा प्रत्यय आपल्याला येत नाही. ॥

## संदर्भसूची

### ग्रंथसूची


| | | |
|---|---|---|
| १. | कवठेकर बाळकृष्ण | - दलित साहित्य एक आकलन, प्रथमावृत्ती, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, जाने. १९८०. |
| २. | क-हाडे सदा | - चरित्र आणि आत्मचरित्र, प्रथमावृत्ती, लोकवाङ्मय प्रकाशन गृह, प्रा. लि. मुंबई ४. |
| ३. | ,, | - दलित साहित्याच्या निमित्ताने, प्रथमावृत्ती, अभिनव प्रकाशन, मुंबई १४, ऑक्टो. १९८२. |
| ४. | जाधव रा. ग. | - निळी पहाट, प्रथमावृत्ती श्रीविद्या प्रकाशन, पुणे, एप्रिल १९७८. |
| ५. | जाधव राजा | - चिंतन, प्रथमावृत्ती, प्रिया प्रकाशन, मुंबई २, सप्टे. ८२. |
| ६. | जोशी अ. म. | - चरित्र आत्मचरित्र, द्वितीयावृत्ती, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर, एप्रिल, १९६६. |
| ७. | पाटणकर रा. भा | - सौंदर्यमीमांसा, प्रथमावृत्ती, इस्थेटिक्स सोसायटी व मौज प्रकाशन, मुंबई १४. |
| ८. | पेंढारकर बाबुराव | - चित्र आणि चरित्र, द्वितीयावृत्ती, व्हीनस प्रकाशन, पुणे, जाने. १९६१. |
| ९. | फडके भालचंद्र | - दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, प्रथमावृत्ती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, एप्रिल १९७८. |
| १०. | ,, | - दलित साहित्याची प्रकाशयात्रा, प्रथमावृत्ती, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, डिसें. १९८०. |

११· बागूल बाबुराव - आठवणींचे पक्षी, द्वितीयावृत्ती, चेतना प्रकाशन, औरंगाबाद

१२· मेश्राम केशव - शब्दांगण, प्रथमावृत्ती, त्रिपुष्प प्रकाशन, मुंबई ४, १९८०·

१३· मांडे प्रभाकर - दलित साहित्याचे निराकरण, प्रथमावृत्ती, धारा प्रकाशन, औरंगाबाद, मार्च १९७९·

१४· शर्मा नारायण - हिंदी आत्मकथा, प्रथमावृत्ती, पुस्तक संस्थान, कानपूर, १९७८·


---

## नियतकालिकसूची


१) अनुबंध, एमेजू १९८४·

२) अस्मितादर्श, जाफेमा १९७३·

३) ,, , जाफेमा १९७८·

४) ,, , दिवाळी अंक १९८३·

५) आलोचना, जाने १९८१·

६) पूर्वा, डिसें· १९८१

७) माय मराठी, दलित साहित्य विशेषांक १९७५·

८) दलित, सप्टें· १९८०·

९) शब्दश्री, मार्च १९८२·

१०) सत्यकथा, जानेवारी १९८०·


---

## दैनिकसूची


१) महाराष्ट्र टाइम्स, १ जून १९८०·